Vol 5 Issue 11 August 2016

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 11 | August - 2016


Review Of Research

# शिलालेखाची लिपी, भाषा, विषय– एक ऐतिहासिक अभ्यास

प्रा. गौतम गोविंद सोनवणे
इतिहास विभाग ,एस. बी. कॉलेज, शहापूर, जि. ठाणे.

सार–

प्रस्तुत लेखात शिलालेख या प्राथमिक दर्जाच्या प्राचीन इतिहास अभ्यासाच्या साधनाचा अभ्यास करण्यात आला आहे.कोरीव लेखाचा महत्वाचा प्रकार म्हणून शिलालेखाचे महत्व, लिपी, भाषा, विषय, शिलालेख कोरण्याची पद्धत,व शिलालेखाचे स्वरुप यांचा आढावा घेण्यात आला आहे.



## प्रस्तावना –

शिलालेख हे प्राचीन भारताच्या इतिहास अभ्यासाचे प्राथमिक दर्जाचे अविनाशी आणि विश्वसनीय साधन मानले जाते. शिलालेख हे पर्वत मय प्रदेशात मोठमोठ्या शिलावर खाडकावर आणि दगडी स्थंभावर कोरले जात असत. शिलालेख कित्येक शतके त्याच स्थितीत राहून प्राचीन इतिहासाची साक्षा पुरवतात. शिलालेख हे प्रामुख्याने मंदिरे, गुहा, शिळेवर कोरले असल्याने त्यांचे स्थलांतर होत नाही. शिलालेखा वरून प्राचीन इतिहासाचा काळ, स्थळ, राजाचे गुण, दान, धर्म, वंशावळ, अधिकारी वर्गाची नामावली, राज्याच्या सीमा, त्याच बरोबर राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व धार्मिक जीवना संबंधीची सखोल माहिती मिळण्यास मदत होते. प्राचीन भारतातील मौर्य, गुप्त, राष्ट्रकुट, वाकाटक, सातवाहन, शिलाहार,व यादव अशा अनेक राजवंशाचे असंख्य शिलालेख मिळाले आहेत.शिलालेख त्या त्या घराण्यांच्या इतिहासाच्या विविध पैलूंचा उलगडा करतात सर्वात प्राचीन शिलालेख सम्राट अशोकचे ब्राम्ही व खरोष्ठी लिपीत उपलब्ध आहेत.

## संशोधांनाची उद्दिष्टे –

- कोरीव लेखाचे महत्व जाणून घेणे.
- शिलालेखाच्या लिपी व भाषेचा आढावा घेणे.
- शिलालेखाच्या विषयाचा आढावा घेणे.
- शिलालेख कोरण्याची पद्धत जाणून घेणे.
- शिलालेखाखाचे स्वरूप जाणून घेणे.

## कोरीव लेख महत्व –

शिलालेख हा कोरीव लेखांचा एक महत्वाचा प्रकार आहे. प्राचीन भारताच्या इतिहासात प्रमुख साधन म्हणून कोरीव लेखाचे महत्व आहे. कोरीव लेखास पुराभिलेख असेही म्हणतात. प्राचीन अवशेषा मध्ये कोरीव लेखांचे स्थान अव्दितीय समजले जाते. 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या ग्रंथात प्रथम डॉ. श. गो तुळपुळे यांनी कोरीव लेख हा शब्द रूढ केल्याचे दिसते. 'प्राचीन मराठी गद्य दृप्रेरणा आणि परंपरा' या ग्रंथात डॉ. श्री .र. कुलकर्णी यांनी कातडीवरील कोरीव लेखांचा उल्लेख केला आहे.इतिहास अभ्यासाच्या साधंनांच्य दृष्टीने कोरीव शब्दाचा अर्थ अतिशय व्यापक आहे. असंख्य कागद पत्रे उपलब्ध करून देणाय इतिहासाचार्य वि. का राजवाडे यांनी कोरीव लेखांच्या वर्गवारीत शिलालेख व ताम्रपटांचे स्थान निश्चित करून ठेवले आहे.[1]

प्राचीन काळात राजे दृमहाराजे, शासन संस्था, धर्मसंस्था, महंत, भक्त यांचा ऐतिहासिक ठेवा कोरीव लेखाच्या रूपात इतिहास जमा करून ठेवत असत. कारण त्याचा उपयोग चालू किंवा पुढील पिढ्यांना व्हावा अशी इच्छा कोरक्याची दिसते. आधुनिक काळातही या प्रथेचे अस्तित्व संपले नाही मोठ मोठ्या सार्वजनिक वास्तु, स्मारके, चर्च, धरणे, पूल, पुतळे या स्थापत्य कलेत अशा प्रकारचे लेख कोरून ठेवले जातात. मात्र प्राचीन काळात त्याचे महत्व अधिक कला कुसरीचे दिसते.प्राचीन काळी भारतीय कलाकार सोने,रुपे,तांबे,लोह,या धातुवर कोरीव लेख कोरीत असत. या शिवाय मोठमोठे दगड, शिळा, स्तंभ, भांडी, विटा इत्यादीवर लेख कोरण्याची परंपरा होती.[2]

## शिलालेखाची लिपी आणि भाषा –

मानवी संस्कृतीचे प्रमुख अंग म्हणजे भाषा आणि लिपी होय. भाषेमुळे मानव संस्कृती विकासाचे नवनवीन टप्पे गाठू शकला.प्राचीन भारतातील कोरीव लेखांच्या अभ्यासाचे मुख्य साधन लिपी आणि भाषा मानले जाते. प्राचीन काळातील बहुतेक शिलालेख हे ब्राम्ही आणि तिच्यापासून उत्पन्न झालेल्या इतर लिपी मध्ये आढळतात. ब्राम्ही लिपी ही भारतातील सर्वात प्राचीन लिपी समजली जाते. त्याशिवाय अनेक शिलालेख खरोष्ठी लिपीत मिळाले आहेत. भाषा आणि लिपीच्या अज्ञानामुळे कोरीव लेख वाचता येत नव्हते. परिणामी इतिहासाचा दीर्घ कालखंड अज्ञात राहिला होता. इ.स. 1837 मध्ये जेम्स प्रिंन्सेप या महान विद्वानाने ब्राम्ही आणि खरोष्ठी लिपीचा उलगडा करून कोरीव लेखांच्या अभ्यासाचा पाया घातला. ही लिपी भारताच्या वायव्य भागात आणि उत्तर सीमा भागात प्रचलित होती.

या शिवाय गुप्ताच्या काळात कीलकशिर्षक लिपीचा तर वाकाटक काळात पेटीकाशिर्षक लिपीचा अवलंब करण्यात आल्याचे दिसते.

ब्राम्ही, खरोष्ठी लिपी बरोबरच अनेक शिलालेख संस्कृत, प्राकृत,मराठी,कानडी भाषेत आढळले आहेत. परिणामी इतिहासाचा सखोल अभ्यास होण्यास मदत झाली.[3]

## शिलालेखाचे स्वरूप आणि महत्व –

पुरातत्वीय पुराव्यामध्ये अतिशय सबळ आणि प्राथमिक दर्जाचा पुरावा म्हणजे शिलालेख होय. प्राचीन काळात जेंव्हा कागदाचा शोध लागला नव्हता तेंव्हा शिलालेख आणि ताम्रपट इतिहासाची साक्षा पुरवत होते. शिलालेखा बद्दल प्रसिद्ध इतिहास संशोधक म. वा. वि. मिराशी म्हणतात. भारतात प्राचीन इतिहासाची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्या सर्व पुरातत्वीय साधनामध्ये शिलालेखाचे विशेष महत्व आहे .भारतात सम्राट अशोकाच्या काळापासून ब्राम्ही व खरोष्ठी लिपीत शिलालेख कोरण्याची परंपरा सुरू झाली. एखाद्या महोत्सवा निमित्त राजे महाराजे एखाद्याला भेट देवून दान करीत असत. त्याचा उल्लेख शिलालेखात करून ठेवला जात असे. शिलालेखात काळाचा, तिथीचा, वाराचा, मुहूर्ताचा, सविस्तर मजकूर नोंदविला जात असे.

इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने शिलालेखाचे मोठे महत्व आहे.शिलालेखामुळे तत्कालीन घटनांची माहिती मिळते. या शिवाय भौगोलिक प्रदेश,राजकीय,सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती,तंत्रज्ञान आणि भौतिक विकासाची अचूक माहिती मिळते.4

## शिलालेख लिहिण्याची पद्धत –

शिलालेख हे कोरीव लेखांचे प्रमुख अंग मानले जाते. प्राचीन भारतातील कोरीव लेखाचे जे पुरावे मिळाले आहेत त्यावरून असे स्पष्ट होते की राजे महाराजे,शासनाधिकारी,समाजश्रेष्ठी,व्यापारीवर्गविशेष प्रसंगाची नोंद करून ठेवण्यासाठी शिलालेख कोरून ठेवत असत. शिलालेखाची योग्य प्रकारे काळजी घेतली जाऊन त्याच्या टिकाऊ पनाकडे लक्ष पुरवले जात असे. ज्या शिळेवर शिलालेख कोरावायचा आहे त्याला प्रथम गुळगुळीत केले जात असे. नंतर त्यावर खडू किंवा काळ्या शाईने रफ मजकूर लिहिला जात असे. त्यानंतर छंनीने त्यावर अक्षरे कोरीत असत.

## शिलालेखाचे विषय –

शिलालेखाच्या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे.शिलालेखात दानांची नोंदणी मोठ्या प्रमाणात आली आहे. सम्राट अशोकाच्या शिलालेखात चौदा आज्ञा आल्या आहेत. रुद्रदामन किंवा खारवेल यांच्या शिलालेखात पराक्रम आणि संस्कृत्यांच्या नोंदी आल्या आहेत. तर राजस्थान मधील राजपूतांच्या तलावावरील मोठेमोठ्या तलाव लेखात काव्य कोरण्यात आले आहे. कांही शिलालेखात नाटक कोरल्याचे दिसते.

कांही शिलालेखात स्त्रिया सती गेल्याचे उल्लेख आले आहेत. अशा शिलालेखांना सतीशीला किंवा महासती कल्लू असे म्हणतात. वीरगळ किंवा विरशीला हा प्रकार ही अनेक शिलालेखातून समोर आला आहे. कांही ठिकाणी दगडी मूर्तीच्या आसन पट्टीवर शिलालेख कोरलेले आढळतात.5 त्यामध्ये राजांची नावे, मूर्तिकाराचे नाव, बिरुदे, प्रशस्ती,व स्तोत्रे शिलालेखातून पाहावयास मिळतात. अनेक इतिहास संशोधकांनी शिलालेखा बद्दल सविस्तर माहिती लिहिली आहे. शिलालेखाची लांबी, रुंदी, अक्षरांची ऊंची,व शिलालेखाचा आकार या बाबींवर प्रकाश टाकून दानविषय, दानाचा प्रकार या विषयी सखोल व चिकित्सक संशोधन केले आहे.

## निष्कर्ष –

शिलालेख हे प्राचीन इतिहास अभ्यासाचे प्राथमिक दर्जाचे महत्वाचे साधन मानले जाते. कोरीव लेखाचा अतिशय महत्वाचा प्रकार म्हणून त्याकडे पाहिले जाते. शिलालेखा वरून काळ, स्थळ, राजवंश, कालखंड, दान, धर्म, लिपी, भाषा या विषयी ठोस माहिती मिळण्यास मदत होते. मात्र कांही शिलालेखांची झीज झाल्यामुळे आणि ते अस्ताव्यस्त असल्यामुळे त्यांच्या वाचनात अनेक आडथळे आल्याचे दिसते. कांही शिलालेखातील अक्षरे नष्ठ झाल्यामुळे अनेक त्रुटी असल्याचे दिसते.

## संदर्भ सूची –

1. संशोधक, धुळे, राजवाडे संशोधन मंडळ (1988) हिरक महोत्सवी. अंक पृ . 100
2. जोशी, ल (1976)मराठी विश्वकोश, खंड –4 मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पृ 337
3. रायरीकर, क. व भालेराव, म (2009 )पुणे डायमंड पब्लिकेशन पृ 2
4. सावंत, उ व बोरकर र (2004)भारतीय पुरातत्वशास्त्र नांदेड,निर्मल प्रकाशन पृ 47
5. गोखले, श (2007) पुराभिलेखविद्या पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन पृ 30



*प्रा. गौतम गोविंद सोनवणे*
*इतिहास विभाग ,एस. बी. कॉलेज, शहापूर, जि. ठाणे.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com